**<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>**

**प्रेस नोट दि.३०/०३/२०१९**

**<u>दि.२९/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १६४/१९,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | मुरलीधर खोकले, सहा.पोलीस निरीक्षक, विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०९/२०१८ रोजी १९/०० वा.रुम नं.१,साठे वस्ती लोहगांव,पुणे येथे |
| **तपशिल** | नमुद वेळी किंवा त्या सुमारास मयताचे राहते घरी रुम नं.१,साठे वस्ती,लोहगांव,पुणे येथे इसम गुलाल सिध्दप्पा व्हसमणी,वय-३० वर्षे,रा.सर्व्हे नं.२७८/१/१,रुम नं.१,साठे वस्ती,लोहगांव,पुणे यास नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन त्याचा गळा आवळुन,कोणत्यातरी कठीण वस्तुने,त्याचे कपाळावर (डोकीस) मारुन,त्यास जखमी करुन त्याचा खुन केलेला आहे. सदर बाबत विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे अकस्मात मयत नं.१०७/२०१८,सीआरपीसी १७४ प्रमाणे दि. १८/०९/२०१८ रोजी १६/५४ वा. दाखल करण्यात आलेली आहे. दाखल अकस्मात मयताचे एकंदरीत झालेले तपासावरुन मयताचा खुन झाला असल्याचे निप्पन्न झाला असल्याने, तपासी अंमलदार एम. आर.खोकले, सहा.पोलीस निरीक्षक,विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजेंद्र पाटील ९९२३४०१३९९ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १२५/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४२ वर्षे,धंदा-सराफ व्यवसाय,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,रा.पलुस,जि.सांगली (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०१/१९ रोजी १२/३० वा. ते दि.२९/०१/१९ रोजी १९/०० वा.चे दरम्यान जैनम गोल्ड, ७४३,रविवार पेठ,मोतीचौक,पुणे व संतोष हॉल समोर,सिंहगड रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचेशी फोनवर संपर्क साधुन,त्यांना सोन्यांचे दागिन्यांची ऑर्डर देवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,त्यांचेकडुन अंगठी, पेंन्डन, टॉप्स, नाकातील चमकी असे एकुण १३,८०,३९०/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने घेवुन,त्याबदल्यात फिर्यादी यांना खोटे सोन्याचे बिस्कीट देवुन,फिर्यादी यांचा विश्वासघात करुन,त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाय.पी.सुर्यवंशी ९४०५९५५३२६ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २११/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ रा.दिप बंगला चौक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०३/२०१९ रोजी १८/५० ते १८/५५ वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांचे मोबाईलवर फोन करून,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचे मोबाईलवरील ओटीपी क्रमांक मिळवुन,फिर्यादी यांचे बँकेचे डेबीट कार्डचे खात्यावरुन ५७,७५०/- रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) बापु शिंदे ९९२३६९५२०५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २१३/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ रा.शिवाजीनगर गावठाण,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०२/२०१९ रोजी दु.१२/१५ ते १३/०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांचे मोबाईलवर फोन करून,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांना नोकरीचे आमिष दाखवुन एक नामांकीत कंपनीचे लिंकवर फॉर्म भरण्यास सांगुन,त्यांचे मोबाईलवरील ओटीपी क्रमांक मिळवुन,फिर्यादी यांचे बँकेतील खात्यावरुन एकुण ११,०००/- रूपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), बापु शिंदे ९९२३६९५२०५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ११५/१९,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-७७ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक महिला व परूष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०४/२०१८ रोजीपासुन ते दि.२५/०६/२०१८ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक महिला व परूष यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे मोबाईलवर संपर्क करुन,फिर्यादीस भविष्य निधीतुन पैसे मिळविण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,सदर प्रोसेससाठी वेळोवेळी मेसेज व वेग-वेगळ्या मोबाईल नंबरवरुन फोन करुन,फिर्यादी यांचेकडुन एकुण १,४६,४१६/- रुपये रक्कम वेग-वेगळ्या बँकेतील खात्यात जमा करण्यास सांगुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.एन.जर्दे ९८५००७७३६० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २९१/१९,भादविक ३५३,३३२,१०८,५०४,३४,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०,११२/११७ ॽ |
| **फिर्यादी** | राहुल इचके,वय-२४ वर्षे,सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक,हडपसर क्षेत्रीय कार्यालय,पुणे महा नगरपालीका,पुणे |
| **आरोपी** | १.मोहन रामलिंग चिंचकर,वय-५२ वर्षे,रा.वेताळबाबा वसाहत गाडीतळ,हडपसर,पुणे (अटक) व इतर एक महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०३/१९ रोजी १६/५५ वा. हडपसर गाडीतळ जनसेवा बँके समोरील रोडवर हडपसर, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालीका अतिक्रमण विभागात सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक या पदावर कार्यरत असुन,नमुद वेळी व ठिकाणी हडपसर भागात त्याचेसोबत अतिक्रमण विभागाचे पोलीस कर्मचारी व हडपसर वाहतुक विभागाचे पोलीस कर्मचारी याचेसोबत अतिक्रमण कारवाई करीत असताना,यातील नमुद इसम मोहन रामलिंग चिंचकर व त्याचे सोबत असलेल्या एका महिलेने सार्वजनिक ठिकाणी जोर-जोरात आरडा-ओरडा करुन, कायदेशीर अतिक्रमण काढण्याचे कर्तव्य करीत असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना शिवीगाळ व धक्का-बुक्की करुन,ते करीत असलेल्या अतिक्रमण कारवाईत अडथळा आणुन,तेथे असलेल्या इतर पथारीवाल्यांना चिथावणी दिली. तसेच फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणलेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.ए.डोके ८६५२१४७५७५ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १९६/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | भगवंता बिडकर,वय-५५ वर्षे, शासकीय लेखा परिक्षक,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०६/२०१२ ते सप्टेंबर २०१२ रोजीचे कालावधीत क्लोव्हर सेंटर सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत,कँम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुरेंद्र कर्डिले हा क्लोव्हर सेंटर सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत,कँम्प पुणे येथे काम करीत असताना,त्याने माहे जुन २०१२ ते सप्टेंबर २०१२ या कालावधी मध्ये वेग-वेगळ्या कारणाने एकुण १,१९,३६३/- रुपयांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.व्हि.कुल्लाळ ९०११०५२६४० |

## दि.३०/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २९८/१९,भादविक ३०७,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(२)१३५ |
| **फिर्यादी** | अब्दुला गोरे,वय-१९,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०३/२०१९ रोजी २०/३० वा. कोनार्क पुरम सोसायटी, कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कारमधुन त्यांची चुलती अंजुम गोरे यांना भेटण्यासाठी जात असताना, फिर्यादी यांनी यातील नमुद एका अनोळखी इसमास थांबण्याचा ईशारा केल्याचा राग मनात धरून,त्याने हाताने व हेल्मेटने फिर्यादीस मारहाण करून,इतर साथीदारांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,जमिनीवर पाडुन,फिर्यादीस ठार मारण्याचे उद्देशाने डोक्यात मारत असताना, त्यांनी तो वार उडविला,सदरची घटना पाहुन त्याचा चुलत भाऊ हसन गोरे याने तु भाईको छोड दे,नही तो मुझे गोली चलानी पडेगी असे म्हणुन त्याने आकाशाचे दिशेने रिव्हॉलवरने गोळी फायर केली. त्या आवाजाने सदर इसम हे पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पवार |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १६५/१९,भादविक ३५३,३३२ |
| **फिर्यादी** | गणेश घोडके, पोलीस शिपाई, विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | निखील धनजय पाटील,वय-२९ वर्षे,रा.कोथरुड पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०३/२०१९ रोजी रात्रौ २२/१५ ते २२/४५ वा.चे दरम्यान हॉटेल हिडन प्लेस,दत्त मंदिर चौक,विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना विमाननगर मार्शल ड्युटी असताना पुणे शहर पोलीस नियत्रण कक्ष यांनी वॉकी टॉकी वरुन दिलेल्या कॉलची पुर्तता करणेकामी हॉटेल हिडन प्लेस या ठिकाणी गेलो असता. तेथील मॅनेजर नामे निखील धनजय पाटील वय २९ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा. साम्राज्य पेठकर फ्लॅट नं १०६ शास्त्री नगर पोलीस चौकीच्या मागे कोथरुड पुणे. मुळ हनुमान आळी सदानंद निवास रुम नं ५ पेन रायगड याने फिर्यादी हे सरकारी कर्तव्य पार पाडत असताना फिर्यादी यांची कॉलर पकडुन फिर्यादी यांना धक्का बुक्की करुन जखमी करुन सरकारी काम करण्यास अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) बलवंत मांगडे ९१५८०१०१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**